## स्वातंत्र्यपूर्वकालीन लांजा :–

मुंबई महामार्गावरील लांजा हे रत्नागिरी जिल्ह्यातील तालुक्याचे शहर जरी तालुक्याचे शहर असले तरी येथील लोकवस्ती जेमतेम १० हजाराच्या आसपासच आहे. आज जरी हे हवेशीर, विविध सोयींनीयुक्त शहर वाटले तरी स्वातंत्र्यपूर्वकाळात लांजा हे अतिशय मागसलेले खेडेच होते. त्यावेळी ब्रिटिशांच्या काळात ८० गावानी मिळून लांजा हा एक महालच होता.

## शिक्षणप्रसार काळाची गरज व न्यू एज्युकेशन सोसायटीची स्थापना :–

स्वातंत्र्यलढ्याबरोबर शैक्षणिक प्रसार हा विचार अनेकांच्या मनात रूजू लागला होता. आपल्या तालुक्याच्या ठिकाणी इंग्रजी शाळा उघडण्याची उर्मी नवशिक्षित तरूणांच्या ह्रदयात निर्माण झाली होती. किंबहुना शिक्षण प्रसार ही काळाची गरज ठरली होती. शिक्षणप्रसारासाठी शिक्षणसंस्था हा विचारही डोळस व विचारी माणसांमध्ये रूजू लागला होता.

''डोळस आणि विचारी माणसाला विचारांचे ओझे झाले की तो त्यांना मुक्तद्वार करून देतो आणि मनावरचे ओझे कमी करतो'' या विचाराप्रमाणे राजापूर हायस्कूलचे प्रिन्सिपॉल कै. दत्तोपंत कुलकर्णी, देवध्याचे कै. दादासाहेब पाध्ये वकील, माजलचे कै. गुणाजी माजळकर, प्रभावनल्लीचे कै. भाऊराव पंडित, भांबेडचे कै. शिवरामभाऊ ठाकूरदेसाई, शिपोशीचे विष्णूपंत आठल्ये, लांज्याच्ये सामंत गुरूजी, कै. अण्णा देशमुख, नारायण तोडकरी, परांजपे गुरूजी, पेडणेकर महालकरी आदि डोळस व विचारी मंडळी २० मार्च १९४५ रोजी काळे छात्रालय लांजा येथे एकत्र जमली व इंग्रजी शाळा सुरू करण्याचे ठरविण्यात आले व यातूनच लांजे व पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांसाठी प्राथमिक, माध्यमिक व उपयुक्त औद्योगिक शिक्षणाची सोय करण्याच्या उद्देशाने १ एप्रिल १९४५ रोजी सध्याच्या न्यू एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली व व्यवस्थापन कमिटी स्थापण्यात आली. या प्रथम व्यवस्थापन कमिटीच्या चेअरमनपदी होते कै. अण्णा देशमुख, व्हाईसचेअरमनपदी व खजिनदार म्हणून भांबेडचे कै. शिवरामभाऊ ठाकूरदेसाई तर सेक्रेटरीपदी निवडले गेले द. सी. सामंतगुरूजी.

## न्यू इंग्लिश स्कूलची मुहूर्तमेढ :–

ध्येयाने प्रेरित झालेल्या मंडळीनी 'संधीची वाट पाहू नका स्वतःच संधी शोधा आणि कामी लागा' या न्यायाने अगदी महिन्याच्या अवधीत ६ जून १९४५ रोजी जुन्या पोष्टासमोरील कै. राजाराम कुलकर्णी यांच्या माडीवर केवळ २६ विद्यार्थ्यांच्या इंग्रजी पहिलीचा वर्ग सुरू केला. तेच आजचे विशाल वृक्षात रूपांतरीत झालेले 'न्यू इंग्लिश स्कूल' होय व कमलाबाई रत्नोजी साळुंखे ही शाळेच्या पटावर नोंदलेली पहिली विद्यार्थीनी होय. तर अध्यापनाची प्रथम धुरा सांभाळणारे होते राजापूरचे निवृत्त शिक्षक कै. वि. वि. लेले.

## वाढत्या गरजा :–

शिक्षण देण्यास सुरूवात केली खरी पण शिक्षण हा एक प्रवाह आहे व तो दिवसेंदिवस वाढतच जाणार आहे. यासाठी सुयोग्य नियोजनाची आवश्यकता असते. संस्थेला शाळेचे वर्ग भरविण्यासाठी स्वतःची इमारत व त्यासाठी जमीन याची अत्यंत निकड होती. चांगल्या कामाला परमेश्वर नेहमीच मदत करतो. किंवा 'सत्कर्माची गोड फळे' या उक्तीप्रमाणे शिक्षणासारख्या पवित्र कामात अडथळे कसे येणार ? संस्थेला वर्गखोल्यासाठी जमिनीची आवश्यकता आहे हे लक्षात येताच लांजा येथील दानशूर नागरिक कै. केशवराव कुलकर्णी व यशोदाबाई आवळेगावकर यांनी अनुक्रमे २१ व १९ गुंठे अशी एकूण ४० गुंठे जमीन बक्षिसपत्राने सन १९४५ मध्ये संस्थेला मोफत दिली आहे. याच जमिनीवर आजच्या इमारतीपैकी चार खोल्यांचे बांधकाम करण्यात आले. याकामी कै. अण्णा देशमुख, कै. गुणाजी माजळकर व कै. शिवरामभाऊ यांनी कर्जरूपाने संस्थेला सहाय्य केले व त्यामुळेच या नूतन हायस्कूलला स्थिर स्वरूप प्राप्त झाले.

## वर्गविस्तार :–

शिक्षण प्रक्रियेतील झालेल्या नविन बदलाप्रमाणे फेब्रुवारी १९५२ पासून इ. ८ वी चा वर्ग १९५३ पासून इ. ९ वी चा वर्ग सुरू झाला. कमी विद्यार्थीसंख्या व तीव्र आर्थिक चणचण यामुळे पुढील वर्ग निघण्यास थोडा वेळ लागला. जून १९५७ पासून इ. १० वी (जुनी) व जून १९५८ पासून इ. ११ वी (जुनी एस्. एस्. सी.) चा वर्ग सुरू झाला. कु. विजया

Scanned by CamScanner

विनायक देशमुख ही एस्. एस्. सी. परीक्षेत या शाळेत प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झालेली पहिली विद्यार्थिनी होय.

संस्थेच्या विकासासाठी कै. अण्णा देशमुख, पांडुरंगशेठ वाघधरे, मासुम नेवरेकर, फकीर नेवरेकर, अक्का तेंडुलकर, शिवरामभाऊ ठाकूरदेसाई, छोटूभाई देसाई, आबा नारकर, डॉ. लिमये, डॉ. ओगले, ग. रा. नारकर, विलास वैद्य, अनंत विराप्पा गांधी, श्री. नाटेकर गुरूजी इ. ज्येष्ठ मान्यवर व्यक्तिनी संस्थेच्या विकासासाठी खूप परिश्रम घेतलेले आहेत. राजापूरचे कै. रावसाहेब कुलकर्णी यांच्या निधनानंतर राजापूर हायस्कूलचे प्रिन्सिपॉल कै. दादासाहेब सरदेशपांडे यांचे मार्गदर्शन या शाळेला लाभले. आपलीच एक छोटी संस्था या आपुलकीने या शाळेच्या विकासाकडे त्यांनी लक्ष दिले होते.

## अस्थिरतेकडून स्थिरतेकडे

संस्थेच्या आर्थिक मर्यादा व बदलता शिक्षकवर्ग यामुळे शाळेला अपेक्षित प्रगती आरंभीच्या काळात साधता आली नाही. शाळेचे स्वरूप काहीसे अस्थिरच होते. अगदी अलीकडील काळात सन १९५९ पासून कै. साखळकर गुरूजी, श्री. रामसिंग, श्री. सुरेश तेंडूलकर या मुख्याध्यापकांच्या कारकिर्दीने शाळेला प्रगतीपथावर आणले. पूर्वी वेतनावर फक्त पन्नास टक्केच शासनाकडून अनुदान मिळत होते. त्यामुळे वेतनावरील खर्च भागविताना संस्थेची आर्थिक ओढाताण होत होती. त्यावेळी तत्कालीन चेअरमन कै. जं. वि. शेट्ये यांनी आर्थिक मदतीचा हात पुढे करून आर्थिक अडचणी सोडविण्यास मदत केली. १९६७ पासून शासाने अनुदान सूत्रात बदल केला व वेतनावर १०० टक्के अनुदान द्यायला सुरूात केली. त्यामुळे संस्थेला खूपच दिलासा मिळाला. शिक्षकांचे पगार वेळेवर होऊ लागले. त्यामुळे शाळेला स्थिर शिक्षकवर्ग लाभू लागला.

## शाखा विस्तार :–

दरम्यान जून १९६५ पासून या संस्थेने भांबेड येथे हायस्कूल सुरू केले. सर्व आर्थिक व्यवहार तेथील स्थानिक कमिटीनेच पाहिले होते. त्यामुळे १–४–६९ पासून सदर हायस्कूल या शाळेपासून अलग करून तेथील स्थानिक संस्थेच्या ताब्यात देण्यात आले.

इमारत विस्तार :–

वाढत्या विद्यार्थी संख्येबरोबर वर्गखोल्यांची गरजही वाढत होती. मे १९६७ मध्ये शासनाने दिलेल्या रू. ५००० च्या अनुदानातून पूर्वीच्या इमारतीला जोडून दोन मोठ्या वर्गखोल्या बांधण्यात आल्या. सदर खोल्याना तत्कालीन येथे असलेल्या कॅनरा कनस्ट्रक्शन कंपनीचे चालक श्री. रामदास केणी यांनी १९६४ मध्ये विनामोबदला कोबा घालून दिला आहे. त्याला रू. १७०००/– एवढा खर्च आला होता. ग्रामपंचायत लांजा यांनी शासनाच्या अल्पबचत अनुदानातून शाळेच्या आवारात २०'x२०' चा एक हॉल वजा खोली बांधून तिचा उपयोग शैक्षणिक कामासाठी करण्यासाठी १९६७ मध्ये कोणतेही भाडे न आकारता संस्थेच्या ताब्यात दिली होती. तसेच १९६६ मध्ये तालुक्याला मिळालेल्या अल्पबचत अनुदानातून आमच्या संस्थेला रू. ५०००/– चे अनुदान मिळाले होते. त्यातून इमारतीला जोडून उत्तरेच्या बाजूस आणखी एक वर्गखोली बांधण्यात आली. तसेच पूर्वेच्या बाजूला कच्च्या शेड उभारून दोन वर्ग भरविले जात असत.

संस्थेकडे स्थिरनिधी नसल्यामुळे आर्थिक चणचण फारच जाणवत होती. अशावेळी रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रू. ७०००/– चे कॅशक्रेडीट मंजूर करून सहकार्य दिले होते. पंचक्रोशीतील ग्रामपंचायती देखील यथाशक्ती आर्थिक मदत करीत होत्या. माजी विद्यार्थी संघाकडून रू. २५००/–ची आर्थिक मदत वाढीव इमारत बांधकामासाठी १९६९ मध्ये मिळाली होती. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मुंबई येथे जाऊनही इमारतीसाठी देणग्या गोळा करण्याचे प्रयत्न केले होते.

## आणि प्रगतीचा वेग वाढला :–

१३ जुलै १९७० पासून कै. कमलाकर पोवार हे मुख्याध्यापक म्हणून संस्थेत रूजू झाले व त्यांनी शाळेच्या प्रगतीला प्रचंड वेग दिला. त्यांच्या १७ वर्षाच्या कारकिर्दीत कुशल नेतृत्वाने व दक्ष शिस्तीने शाळेची शैक्षणिक व भौतिक भरभराट खूपच झाली. रत्नागिरी जिल्ह्यातील एक प्रगतीशील व प्रयोगशील प्रशाला म्हणून तिचा उल्लेख होऊन तिचे नाव महाराष्ट्रभर गेले.

शाळेच्या रंगमंचावर नामांकित कंपन्यांचे नाट्यप्रयोग करून संस्थेच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी आर्थिक मदत मिळविण्याचा प्रयत्न केला. एस्. एस्. सी. परीक्षेला बाहेरगावी जाण्यासाठी पालकांना आर्थिक बोजा सहन करावा लागतो हे ओळखून कै. दादासाहेब सरदेशपांडे यांच्या सहकार्याने मार्च १९७२ पासून लांजा येथे एस्. एस्. सी. केंद्र सुरू झाले व ते आजतागायत सुरळीतपणे चालू आहे.

१९७७ मध्ये लांजा येथील दानशूर नागरिक व निवृत्त प्राथमिक शिक्षक कै. राजाराम रामकृष्ण भागवत यांनी आपली पत्नी कै. सौ. यशोदाबाई यांच्या स्मरणार्थ लांजा येथील त्यांची स्वकष्टार्जित मिळकत जमीन दोन इमारतीसह संस्थेला बक्षिसपत्राने दिली आहे.

Scanned by CamScanner

कै. पोवार सर यांच्याच कारकिर्दीत शासनाच्या नवीन धोरणानुसार प्राथमिक शाळांचे ५ वी ते ७ वीचे वर्ग हायस्कूलला जोडण्यात आले. त्यामुळे वर्गखोल्या अपुऱ्या पडू लागल्या. पर्यायाने शाळा दुबार पध्दतीत भरू लागली. ती आजतागायत दुबारच भरत आहे. १८ ऑगस्ट १९७६ पासून येथे कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरू झाले. ग्रामस्थांनी डॉ. बी. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. पत्की, डॉ. लिमये, लांज्याचे तत्कालीन सरपंच श्री. बाबू शेट्ये, श्री. काका डोर्ले व वाकेडचे श्रीकांत विठ्ठल शेट्ये इ. मान्यवरांनी एक उच्च माध्यमिक सहाय्यक समिती स्थापन केली. त्यांनी सुमारे ३४ हजार रूपयांचा निधी जमविला व त्यातून कनिष्ठ महाविद्यालयीन वर्गांसाठी दोन खोल्या बांधण्यात आल्या. सदर वर्गांची परवानगी मिळविण्याच्या कामी तत्कालीन शिक्षणमंत्री प्रा. सदानंद वर्दे व बांधकाममंत्री श्री. जगन्नाथराव जाधव यांनी मोलाचे सहकार्य केले. आज या कनिष्ठ महाविद्यालयात कला व वाणिज्य शाखेत २६३ विद्यार्थी शिकत आहेत. येथील उच्च शैक्षणिक दर्जामुळे विद्यार्थ्यांचा ओढा सतत आमच्याच कनिष्ठ महाविद्यायात प्रवेश घेण्यासाठी असतो. इ. १२ वी चे निकाल ९३ टक्क्यापर्यंत लागले आहेत. एस्. एस्. सी. विद्यार्थी संख्याही वाढली आहे. सध्या इ. १० वीच्या चार तुकड्या असून त्यात २१६ विद्यार्थी शिकत आहेत. विनीत व मेहनती शिक्षकवर्ग यामुळे एस्. एस्. सी. चे निकालही चांगले लागतात.

शाळेची क्रीडा व शैक्षणिक क्षेत्रातील प्रगती व एस्. एस्. सी. परीक्षेचे निकाल लक्षात घेऊन मार्च १९८८ मध्ये महाराष्ट्र शासनाने आमच्या हायस्कूलला दहा हजार रूपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देऊन या शाळेचा गौरव केला आहे ही गोष्ट आम्हाला निश्चितच भूषणावह आहे. त्याचा विनियोग ग्रंथालय व विज्ञानसाहित्य यासाठी केला आहे.

## माजी विद्यार्थी संघाचे योगदान :–

सन १९६५ मध्ये संस्थेची व शाळेची निकड लक्षात घेऊन माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन संस्थेला रंगमंदिर बांधून दिले आहे. याकामी श्री. रखांगीसर, श्री. बापू शेट्ये, श्री. आदम मापारी सर आणि बबनशेट वाघधरे इ. चा सिंहाचा वाटा आहे. नाट्यप्रयोगासाठी सदर रंगमंदिर भाड्याने देऊन थोडेफार उत्पन्न संस्थेला मिळत असे मात्र त्याचा मंडप दरवर्षी उभारावा लागत असे. या शाळेचे अल्पबचतीचे उल्लेखनीय कार्य पाहून १९८५ मध्ये शासनाने संस्थेला ४० हजाराचे भरीव अनुदान दिले. याकामी लांज्याचे तत्कालीन सभापती श्री. ग. रा. नारकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले. ही अनुदानाची रक्कम व शालेय विकासनिधीमधील रक्कम यातून मार्च १९८७ मध्ये ४५'×२८' चे पक्के विद्यार्थी रंगमंदिर बांधण्यात आले व दरवर्षी मंडप उभारावा लागण्याचा प्रश्न सुटला. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपले प्रयत्न न सोडता रंगमंचाला आवश्यक अशी पक्की भिंत बांधून नाट्यगृह बंदिस्त करून दिले आहे. याकामी प्रामुख्याने श्री. महंमद रखांगी, श्री. कुमार बेंडखळे, काका शिंदे, श्री. संगाप्पा भाईशेट्ये, श्री. राजाभाऊ आठल्ये इ. नी. पुढाकार घेतला. याचा उपयोग इतरवेळी वर्गखोली म्हणून करण्यात येतो. याशिवाय मुख्य इमारत व रंगमंदिर यामधील मोकळी जागा बांधकाम करून जोडण्यात आली आहे. त्यामुळे आणखी एक वर्गखोलीची सोय झाली आहे. हे सर्व घडले ते माजी विद्यार्थी संघाच्या योगदानातूनच.

## आदर्श देणगी :–

या शाळेचे सर्वात ज्येष्ठ विद्यार्थीप्रिय शिक्षक श्री. रखांगीसर यांचा त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर विद्यार्थी, शिक्षक, ग्रामस्थांतर्फे सत्कार करण्यात आला. सत्काराच्यावेळी त्यांना मिळालेली सत्कारनिधीची सर्व रक्कम आणखी त्यात स्वतःचे ५०००/– रू. घालून त्यांनी संस्थेच्या शैक्षणिक विकासासाठी देणगी देऊन समाजासमोर एक आदर्श निर्माण केला आहे.

नवी उमेद नवे नेतृत्व :–

केवळ भौतिक सुविधांची कमतरता वगळता शाळेच्या शैक्षणिक विकासाचा आलेख सतत वाढतच होता. आणखी भौतिक व इतर उपलब्धता झाल्यास शाळेच्या शैक्षणिक विकासाला अधिक चालना मिळेल व सर्वांगीण विकास होईल व एक गुणवंत नामवंत शाळा म्हणून नावलौकिक प्राप्त होईल या उद्देशाने लांज्यातील काही शिक्षणप्रेमी नागरिकांच्या मनात संस्थाविकासासाठी काही निश्चित योजना आखल्या जात होत्या. त्यातील आमच्या तालुक्यातील थोर स्वातंत्र्यसैनिक श्री. नानासाहेब वंजारे यांचे चिरंजीव श्री. भाऊसाहेब वंजारे यांनी १९८६ मध्ये सरकारी नोकरीतून स्वेच्छा निवृत्ती घेतल्यानंतर संस्थेचा विकासात्मक दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून कामास सुरूवात केली व काही कारणाने ठप्प झालेला संस्थेचा कारभार पुन्हा नव्या जोमाने चांगल्याप्रकारे सुरू होण्यास प्रेरणा मिळाली. नवी उमेद घेऊन नव्या नेतृत्याचा उदय झाला,

प्रथमतः त्यांनी गावातील सर्व जाणकार व शिक्षणप्रेमी मंडळींची सभा घेतली. तत्कालीन चेअरमन श्री. शामराव पानवलकर यांच्या सहकार्याने संस्थेचे हिशेब पूर्ण करून घेऊन त्यावेळचे सरपंच श्री. बबनशेठ वाघधरे यांच्या नेतृत्वाखाली एक वर्षासाठी अस्थायी कार्यकारीणी नेमून घटना दुरूस्ती व आजीव

Scanned by CamScanner

सभासद नोंदणी इ. आवश्यक गोष्टी करून १९९५ च्या मध्यात सर्व सभासद, ग्रामस्थ व गावातील शिक्षणप्रेमी यांची पुन्हा सभा घेऊन सर्वसमावेशक अशी नवीन आज कार्यरत असलेली कार्यकारिणी अस्तित्वात आणली.

## नवा उत्साह व कामाचा धडाका :–

नवीन संचालक मंडळाने श्री. भाऊ वंजारे यांचे मार्गदर्शनाखाली धडाकेबंद कामाला सुरूवात केली. 'Action speaks louder than the words' या म्हणीप्रमाणे केवळ शब्दांची रेलचेल करण्यापेक्षा शाळेचा विकासात्कम दृष्टीकोन डोळ्यांसमोर ठेऊन प्रत्यक्ष कृती करण्यास सुरूवात केली. 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' या न्यायाने सर्व कामात स्वतःला झोकून घेतले.

प्रथमतः भूविकास बँकेचे माजी चेअरमन कै. श्री. दाजी तथा अ. सा. चव्हाण यांचे चिरंजीव श्री. मोहनराव चव्हाण यांना विनंती करून त्यांचे वडीलांचे नावे सुमारे २ लाख रूपये किंमतीचा एक हॉल बांधून घेतला.

## महाविद्यालय एक धाडसी पाऊल :–

सन १९९५ च्या जूनला युती सरकारचे मुख्यमंत्री मा. मनोहर जोशी यांनी रत्नागिरी जिल्ह्यात लांजा व मंडणगड येथे पूर्ण अनुदानित तत्वावर कॉलेज देण्याचे जाहीर केले. सर्वोत्तम शैक्षणिक विकास हे उदात्त ध्येय बाळगणाऱ्या मंडळींसमोर हे एक आव्हानच होते. सुवर्णसंधी आहे खरी पण परत भूतकाळातील घटना आठवू लागल्या. पण ध्येयवादी माणसे आपल्या ध्येयापासून हटत नाहीत त्याप्रमाणे 'भूतकाळासाठी रडण्यापेक्षा, वर्तमातकाळाशी लढण्यात आणि भविष्याच्या शिखरावर चढण्यात खरा पराक्रम आहे' हे ओळखून या संधीचा फायदाही आपण उठवावा असे श्री. भाऊ वंजारे, डॉ. लिमये इ. मंडळींनी ठरविले. ठरविले खरे पण पुन्हा भविष्यातील अडचणींचा डोंगर डोळ्यासमोर उभा राहिला. अजून शाळेसाठी सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करू शकलो नाही तर कॉलेजसाठी स्वतंत्र मोठी जागा, इमारत भव्य ग्रंथालय इ. समस्या कशा सोडविणार? मोठी अडचण होती जागेची. श्री. भाऊ वंजारे यांनी ही जबाबदारी स्वतःच्या खांद्यावर घेतली. 'Charity begins at home' या न्यायाने त्यानी ताबडतोब त्यांच्या आई श्रीमती कुसुमताई वंजारे यांच्या संमत्तीने ५ एकर जागा कॉलेजसाठी विनामूल्य देण्याचे जाहीर करून कामाला सुरूवात केली. कॉलेज परवानगीसाठी मध्यंतरी अनेक अडचणी व अडथळे आहे. ''रस्त्यात काटे आले म्हणून त्याच्या बाजूने जाणे म्हणजे अज्ञान होय'' या म्हणीप्रमाणे सर्व अडचणींवर मात करतो तोच यशस्वी होतो हे ओळखून आमच्या मुंबई समितीचे चेअरमन व मुंबई विद्यापीठाचे तत्कालीन उपकुलसचिव मा. काकासाहेब सरफरे यांनी विधानसभेचे सभापती मा. दत्ताजी नलावडे यांची कॉलेजसाठी शिफारस मिळवून परवानगीचा मार्ग मोकळा केला. त्यानंतर आवश्यक ती कागदपत्रे पूर्ण केल्यानंतर उच्च शिक्षण व तंत्रशिक्षणमंत्री मा. दत्ताजी राणे यांचे याकामी फार मोलाचे सहकार्य मिळाले व त्यामुळेच कॉलेजच्या परवानगीवर शिक्कमोर्तब झाले महाविद्यालयासाठी टाकलेले एक धाडसी पाऊल खंबीरपणे रोवले गेले व जून १९९६ पासून लांजा येथे महाविद्यालय सुरू झाले. या दोघांचे ऋण संस्थेला विसरता येणार नाही.

## मदतीचा ओघ :–

नवीन कार्याकारिणीने सुरू केलेला कामाचा धडाका, त्यात मिळू लागलेले यश, नवनवीन योजनांची अंमलबजावणी यामुळे लांजावासियांच्या मनात संस्तेविषयी आदर निर्माण झाला व धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांना सहाय्य करण्यासाठी विविध माध्यमातून मदतीचा ओघ सुरू झाला.

मध्यंतरी आपल्या विभागाचे खासदार मा. सुधीर सावंत यांच्या खासदार फंडातून आमच्या संस्थेचे व्हा. चेअरमन श्री. महंमद रखांगी व श्री. बापू शेट्ये यांच्या प्रयत्नातून दोन लाख ७० हजाराचा निधी उपलब्ध झाला. श्री. महमंद रखांगी यांनी जि. प. अध्यक्ष मा. राजाभाऊ लिमये यांना भेटून राज्यसभेच्या उपाध्यक्षा मा. नजमा हेपतुल्ला यांचे निधीतून आमचे कॉलेजसाठी काही निधी मिळविण्याचा प्रयत्न केला व यामुळेच मा. राजाभाऊ लिमये व मा. गोविंदराव निकम यानी ५ लाख रूपयाची भरीव रक्कम संस्थेला मिळवून दिली व आणखी देण्याचे आश्वासन दिले आहे.

आमच्या संस्थेचे सेक्रेटरी श्री. सदानंद देशमुख यांचे प्रयत्नाने त्यांचे भाऊ श्री. राजाभाऊ देशमुख यांनी आयुष्याच्या अखेर, दानासाठी साठविलेले २ लाख रू. आमच्या संस्थेच्या शैक्षणिक विकासासाठी सुपूर्त केले आहेत. केवढे मोठे औदार्य! याशिवाय देशमुख कुटुंबीय दरवर्षी हायस्कूल इमारतीच्या करंट रिपेअरींगचा खर्च स्वयंस्फूर्तीने करत असतात. सर्वच कुटूंबियांचे संस्थेवरील प्रेम उल्लेखनीय आहे.

आमचे कामात कोणीच मागे रहायला तयार नाहीत. आमचे सहसचिव श्री. नाना मानकर हे सुध्दा नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मा. मधु दंडवते यांचे मार्फत भरीव मदत मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. संस्थेचे हितचिंतक व तालुक्याचे निवृत्त शिक्षक श्री. शिवाजीराव खानविलकर यांनी ठिकठिकाणी विभागवार प्राथमिक शिक्षकांच्या संस्थेच्या संचालकांच्या वतीने सभा घेऊन

Scanned by CamScanner

संस्थेसाठी भरीव रक्कम जमा करून दिली. मुंबई येथे सुध्दा माजी उपकुलसचिव मा. प. भि. सरफरे यांच्या सहाय्याने श्री. रविंद्र माने, श्री. का. ग. बेर्डे, श्री. अजित तेंडुलकर, श्री. मधुभाऊ देशमुख, श्री. सु. रा. तेंडुलकर हे संस्थेला भरघोस निधी मिळवून देण्याच्या कामी प्रयत्नशील आहेत.

शाळेच्या विद्यार्थीवर्गानेही आपला खारीचा वाटा उचलण्याचे महत्व जाणून सुमारे ५० हजाराचेवर निधी उपलब्ध केला आहे. शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गानेही मुख्याध्यापक श्री. शेट्येसर, पर्यवेक्षक देशपांडेसर व ज्येष्ठ शिक्षक श्री. विजय बेर्डेसर यांच्या नेतृत्वाखाली १ लाख २० हजाराचा भरीव निधी उपलब्ध करून दिला आहे.

मुंबई येथील सिध्दीविनायक ट्रस्टनेही १५ लाख रूपये देण्याचे मान्य केले आहे. अशाप्रकारे चांगल्या कामाला सर्वांचाच हातभार लागतो. त्यामुळे आमच्या या शैक्षणिक विकासाच्या कामाला विविध संस्था, व्यक्ती यांच्या देणग्यांचा ओघ सुरू आहे. योजनाही तेवढ्या विस्तारत आहेत व निधीची आवश्यकताही तेवढीच वाढणार आहे.

## स्वप्नपूर्तीसाठी .....

प्रतिवर्षी विद्यार्थीसंख्या वाढत असून आजअखेर शाळेत १४०१ विद्यार्थी शिकत आहेत. वर्ग २२ व वर्गखोल्या १४ अशी शाळेच्या इमारतीची परिस्थिती आहे. त्यामुळे शाळा दुबार भरवावी लागते. दोन्ही सत्रातील शाळा एका सत्रात आणण्यासाठी आज आहे तेवढ्याच इमारतीची आवश्यकता आहे. शिवाय स्वतंत्र प्रयोगशाळा, प्रशस्त वाचनालय, अभ्यासिका, मुलींसाठी स्वतंत्र खोली इ. ची. पूर्तता करणे. नवीन महाविद्यालयासाठी १५ खोल्यांची सुसज्ज इमारत बांधणे हे आमचे स्वप्न असून या सर्वांच्या पूर्ततेसाठी संस्थेला खूपच भरीव निधीची आवश्यकता आहे. आमचे तसे प्रयत्नही चालू आहेत. विविध संस्था, शाळेचे माजी विद्यार्थी, हितचिंतक, दानशूर व्यक्ती यांनी हातभार लावल्यास ह्या सर्व गोष्टींची कमतरता आम्ही निश्चितच पूर्ण करू अशी खात्री आहे.

'शाळेतला पहिला पाठ जोडाक्षराने सुरू होत नसला तरी आयुष्यातील पहिला पाठ मात्र जोडाक्षराने सुरू होतो तो म्हणजे कर्तव्य.' या कर्तव्यभावनेतूनच अनेक दानशूर व्यक्ती पुढे येऊन शिक्षणविकासाचा हा गोवर्धन पर्वत उचलण्यास निश्चित हातभार लावतील असा विश्वास वाटतो. आम्ही मागे पडणार नाही मात्र सर्वांच्या सहकार्यावर व आशीर्वादावरच हे सर्व अवलंबून आहे.

अगदी थोड्या कालवधीत आम्ही नियोजनातील काही गोष्टींची पूर्तता करू शकलो याचे समाधान वाटते. अजून खूप गोष्टी करायच्या बाकी आहेत. त्यादृष्टीने वाटचाल चालू असून शिक्षणविकासाचे ध्येय गाठण्याचा आमचा प्रयत्न आहे. आमच्या मनातील सर्व कल्पनाना मूर्त स्वरूप प्राप्त करून स्वप्नपूर्तीच्या शुभ दिनाची आम्ही वाट पहात आहोत.

आपणासारख्या दानशूर व उदार अंतःकरण असणाऱ्या व्यक्तींच्या सहकार्यातून आमच्या संकल्पपूर्तीचा तो सोन्याचा दिन येवो हीच सदिच्छा.

॥ जयहिंद ॥

Scanned by CamScanner